# नगर परिषद कार्यालय, मलकापूर

प्रशासकीय सर्वसाधारण सभा दि २३/११/२०२३

## कार्यवृत्त

आज दि २३/११/२०२३ रोजी सकाळी ११ वाजता मा. प्रशासक महोदय नगर परिषद मलकापूर यांचे दालनात मलकापूर नगर परिषदेच्या बांधकाम, आरोग्य, विद्युत व नियोजन विभाग यांनी सादर केलेल्या खालील विषयाकरिता प्रशासकीय सर्वसाधारण सभेचे आयोजन करण्यात आले होते.

| अ.क्र. | विषय |
|---|---|
| | **बांधकाम विभाग** |
| १ | घनकचरा व्यवस्थापन साईटवरील बायोगॅसच्या बलून ला प्लॅटफॉर्म बनवणे बाबत. |
| २ | नगरपरिषद निधी अंतर्गत प्रभाग क्र. १ मधील रस्ता व नालीचे बांधकाम करणेबाबत. |
| | **आरोग्य विभाग** |
| ३ | जिल्हा नियोजन व विकास समिती DPDC निधी अंतर्गत फिरते शौचालय करिता प्रस्ताव पाठविणे बाबत. |
| | **विद्युत विभाग** |
| ४ | मलकापूर न.प. हद्दीतील माता महाकाली नगर मधील धोकादायक डी.पी.ची जागा बदलण्याबाबत. |
| | **नियोजन विभाग** |
| ५ | केंद्र शासनाच्या विशेष सहाय्य योजनेअंतर्गत राज्यांना भांडवली खर्चासाठी सन २०२२-२३ या वर्षात मिळणारे बिनव्याजी कर्ज प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव सादर करणेबाबत. |

**विषय क्र १:- घनकचरा व्यवस्थापन साईटवरील बायोगॅसच्या बलून ला प्लॅटफॉर्म बनवणे बाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, खापरखेडा शिवारातील घनकचरा व्यवस्थापन साईटवर बायोगॅसची बलून रूम ही जमिनीवर लगत असल्याने उंदरापासून उपद्रव झाल्यास त्यामधील गॅस बाहेर पडून भविष्यात हानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याकरिता बायोगॅसच्या बलून ला उंच असा प्लॅटफॉर्म बनवणे अत्यंत गरजेचे असल्याचे नमूद केले आहे.

त्यानुसार, वरील सर्व बाबींचा विचार करता घनकचरा व्यवस्थापन साइटवर बायोगॅस बलून हे महत्त्वाचे असून त्याला उंदरांपासून उपद्रव टाळण्याकरिता उंच प्लॅटफॉर्म करण्याच्या कार्यवाहीस व सदर कामास येणारा खर्च न.प. निधी अंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र २ :- नगरपरिषद निधी अंतर्गत प्रभाग क्र. १ मधील रस्ता व नालीचे बांधकाम करणेबाबत.**

वरील विषयास अनुसरून नगर अभियंता बांधकाम विभाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार, मा.आमदार राजेश पंडितराव एकडे विधानसभा सदस्य, मलकापूर विधानसभा मतदारसंघ यांचे पत्र क्र.२१-मविस/२०९८/२०२३ दि. ०७/११/२०२३ नुसार मलकापूर न.प. हद्दीतील प्रभाग क्र. १ मध्ये नागरिकांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता खालील विकास कामे न.प. फंडातून करण्याबाबत कळविले आहे.

१) प्रभाग क्र. १ मलकापूर येथे शेख शब्बीर यांचे घरापासून ते यासीरखा ते नदी किनाऱ्यापर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे.

२) प्रभाग क्र. १ मलकापूर येथे साबीर मास्तर यांचे घरापासून ते मुस्लिम कब्रस्तान पर्यंत रस्ता कॉंक्रिटीकरण व नाली बांधकाम करणे.

त्यानुसार, वरील नमूद प्रभाग क्र. १ मधील करावयाच्या रस्ता व नाली बांधकामच्या कार्यवाहीस व येणारा खर्च नगरपरिषद फंडातून करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र ३:- जिल्हा नियोजन व विकास समिती DPDC निधी अंतर्गत फिरते शौचालय करिता प्रस्ताव पाठविणे बाबत.**

वरील विषयास अनुसरून प्र. आरोग्य निरीक्षक यांनी सादर केलेल्या अहवालानुसार मा. जिल्हाधिकारी महोदय यांच्या सूचनेनुसार जिल्हा नियोजन व विकास समिती DPDC निधी अंतर्गत न.प. मलकापूर साठी फिरते शौचालय खरेदी करणे बाबत व त्यासाठी प्रस्ताव पाठविण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरी या अगोदर स्वच्छ भारत अभियान अंतर्गत शासन निर्णयानुसार फिरते शौचालयसाठी रु. ६,५३,०००/- इतकी रक्कम ठरविण्यात आली होती. तरी याव्यतिरिक्त DPDC मधून शौचालय खरेदीचा प्रस्ताव पाठविण्यासाठी व पुढील निविदा प्रक्रिया करून खरेदीची कार्यवाही करण्यासाठी मंजुरीची आवश्यकता असल्याचे नमूद केले आहे.

त्यानुसार, ठरवण्यात येते की, जिल्हा नियोजन व विकास समिती DPDC निधी अंतर्गत फिरते शौचालय करिता मा. जिल्हाधिकारी महोदय बुलढाणा, यांच्याकडे सदर विषयाचा प्रस्ताव पाठवण्याच्या कार्यवाहीस ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र ४:- मलकापूर न.प. हद्दीतील माता महाकाली नगर मधील धोकादायक डी.पी.ची जागा बदलण्याबाबत.**

वरील विषयास अनुसरून विद्युत अभियंता यांनी सादर केलेल्या अहवालानुसार न.प. हद्दीतील माता महाकाली नगर मधील श्री. गजानन पाटील यांच्या घराजवळ विद्युत वितरण कंपनीची डी.पी. असून त्यामध्ये वारंवार बिघाड होत असून आग लागल्याचेही निदर्शनास आले आहे. तसेच सदर डी.पी. रहदारी मार्गाच्या मध्ये येत असल्यामुळे मोठी वाहने तसेच त्या भागातील नागरिकांना दैनंदिन दळणवळणात अडचणी येत आहेत. त्याचप्रमाणे गणपती उत्सव, नवरात्री उत्सवाच्या वेळी मिरवणुकी दरम्यान सदर डी.पी. मुळे मोठ्या प्रमाणात अडचण होत आहे. तसेच सदर बाबतीत या भागातील नागरिकांच्या तक्रारी व अर्ज देखील नगरपरिषदेस प्राप्त झाले आहेत. त्यानुसार सदर डी.पी. मुळे होणारी अडचण व त्रास टाळण्यासाठी आहे त्या जागेवर हटवून विवेकानंद आश्रमाच्या मागील बाजूस स्थलांतरित करावी लागेल असे नमूद केलेले आहे.

त्यानुसार ठरविण्यात येते की, माता महाकाली नगर मधील धोकादायक डी.पी. चे स्थलांतर करण्याकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मलकापूर यांचेकडून १३.३ % डी.डी.एफ. योजनेअंतर्गत अंदाजपत्रक बनवून घेण्याच्या कार्यवाहीस व सदर कामास येणारा खर्च न.प. निधी अंतर्गत करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

**विषय क्र ५:- केंद्र शासनाच्या विशेष सहाय्य योजनेअंतर्गत राज्यांना भांडवली खर्चासाठी सन २०२२-२३ या वर्षात मिळणारे बिनव्याजी कर्ज प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव सादर करणेबाबत.**

उपरोक्त विषयास अनुसरून सहा. नगररचनाकार, नियोजन विभाग यांनी सादर केलेल्या अहवालानुसार केंद्र शासनाच्या विशेष सहाय्य योजनेअंतर्गत राज्यांना भांडवली खर्चासाठी सन २०२२-२३ या वर्षात मिळणारे बिनव्याजी कर्ज प्राप्त होण्यासाठी मलकापूर शहराच्या विकास आराखड्यातील आरक्षण क्र. ४३ मधील ०.८९ हे. जागेवर बगीचा विकसित करण्याकरिता अंदाजे ४ कोटी एवढ्या निधीची आवश्यकता असल्याकारणाने सदर निधी हा बिनव्याजी कर्जा स्वरूपात प्राप्त होण्याकरिता शासनास प्रस्ताव पाठविणे गरजेचे असल्याचे नमूद केले आहे.

त्यानुसार ठरविण्यात येते की, मलकापूर शहराच्या विकास आराखड्यामधील आरक्षण क्र. ४३ मधील ०.८९ हे. जागेवर बगीचा विकसित करण्याकरता आवश्यक निधी केंद्र शासनाच्या विशेष सहाय्य योजने अंतर्गत राज्यांना भांडवली खर्चासाठी सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात मिळणारे बिनव्याजी कर्ज स्वरुपात प्राप्त होण्यासाठी प्रस्ताव पाठवण्याच्या कार्यवाहीस ही सभा मान्यता देत आहे.

**आर.यु. सुरडकर**
**प्रशासक**
**नगर परिषद मलकापूर.**